# Epuja Spiritech Limited

Reg. Off. - Marathon Icon, 6th Floor, Office Number 606,
Off Ganapatrao Kadam Marg, Lower Parel, Mumbai - 400013
Corp. Off.- 32/1, Vasishta Paradise, Temple Road, 11th Cross, Malleswaram, Bangalore 560003.
Mobile No. 916263879732; E-mail- splgrive@rediffmail.com
CIN: L96906MH1980PLC170432; Website: www.sagarproductions.com


Date: 31/07/2026

To,
**BSE Ltd**
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street Fort,
Mumbai – 400001

**Scrip Code: 532092**

**Subject: Intimation under Regulation 30 (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015**

Dear Sir/Ma'am,

With reference to the subject referred Regulation, we would like to inform you that the Notice of Postal Ballot has been published in The Business Standard Newspaper in English & Tarun Bharat Newspaper in Marathi on 31st July, 2026. A copy of the said newspaper advertisements are enclosed for your reference & record.

Please take note of the same.

**FOR, EPUJA SPIRITECH LIMITED**
**(Formerly known as Sagar Productions Limited)**

DEEKSHA PATHAK
Digitally signed by DEEKSHA PATHAK
Date: 2026.07.31 15:24:22 +05'30'

**DEEKSHA PATHAK**
**COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER**

**Place: Mumbai**

# ‘महाराजस्व अभियान’ लोकाभिमुख प्रशासनाचे मॉडेल : बावनकुळे

## ठाण्यात महसूलमंत्र्यांचा दौरा; जिल्ह्यातील ७६ हजार कुटुंबांना शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात यश

**ठाणे, दि. ३० : विशेष प्रतिनिधी**

‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व’ अभियानांतर्गत आयोजित ‘समाधान’ शिबिरांच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील तब्बल ७६ हजार कुटुंबांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात यश आले आहे. हे अभियान लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासनाचे उत्तम उदाहरण ठरले आहे,’’ असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी ठाण्यात केले. यावेळी ठाण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच दोन नवीन तहसील कार्यालये सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून व जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या पुढाकाराने गडकरी रंगायतनसमोरील शिवसमर्थ विद्यालयात ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’ आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमास आ. संजय केळकर, आ. मंदाताई म्हात्रे, आ. निरंजन डावखरे, आ. विक्रांत पाटील, आ. माधवी नाईक, आ. रवींद्र फाटक, आ. किसन कथोरे, आ. कुमार आयलानी, उपमहापौर कृष्णा पाटील, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमस्थळी महसूलमंत्री बावनकुळे यांचे जल्लोषात स्वागत झाले. त्यांनी विविध शासकीय विभागांच्या स्टॉल्सना भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिबिरात उपस्थित नागरिकांच्या तक्रारी व निवेदने महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्वतः स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी ‘सामाजिक अर्थसाहाय्य योजना’, ‘वनहक्क कायदा’ आणि ‘गौण खनिज नियम’ या माहितीपर पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विविध शासकीय योजनांतील लाभार्थ्यांना दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. दरम्यान, शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ठाण्याचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांचा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर बावनकुळे यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधत विविध प्रश्नांना उत्तरे दिली.



### महसूल विभागातर्फे महत्त्वाच्या प्रकल्पांना गती

ठाणे-पालघर परिसरातील विविध विकास प्रकल्पांसाठी महसूल विभागाने महत्त्वाचे निर्णय घेतल्याची माहिती मंत्री बावनकुळे यांनी दिली. कल्याण-अंबरनाथ कृषी उत्पन्न बाजार समिती, मल्टी-मॉडेल हब, वाढवण बंदराशी संबंधित प्रकल्प, कांदळवनसंवर्धनासाठी ७३.७३ एकर जमीन, ठाण्यात ग्री युनिट व कन्व्हेन्शन सेंटर, ‘बीएसएनएल’च्या ६० टॉवर्ससाठी जागा, अंबरनाथ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नवोदय विद्यालयसह मिरा-भाईंदरमधील ‘एमटीपी प्लांट’, कोस्टल रोडसाठी जमीन, अनुकंपा तत्त्वावर भरतीचा प्रश्नही निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### महसूलमंत्र्यांकडून ठाण्याचे विशेष कौतुक

ठाणे जिल्हा प्रशासन आणि जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नियोजनबद्ध कामाचे महसूलमंत्र्यांनी विशेष कौतुक केले. राज्यात १० लाख कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट असून, त्यामध्ये ठाणे जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आ. संजय केळकर यांनी त्यांच्या एकट्या मतदारसंघात आठ हजार कुटुंबांना लाभ मिळवून दिला, तर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

### लवकरच ‘लॅण्ड टायटलिंग ॲक्ट’, सरकारमान्य प्रॉपर्टी कार्ड देणारे महाराष्ट्र ठरेल देशातील पहिले राज्य

नागरिकांना दिलासा देणाऱ्या कायदेशीर निर्णयांवर प्रकाश टाकताना बावनकुळे म्हणाले की, ‘‘बिगरशेती (एनए) परवानगीची अट रद्द करण्यात आली असून तुकडेबंदी कायदाही मागे घेण्यात आला आहे. तसेच दि. १ जानेवारी २०११ पूर्वीच्या शासकीय जागांवरील घरांचे नियमितीकरण करण्यात येणार असून आगामी डिसेंबरमध्ये नागपूर अधिवेशनात महाराष्ट्रातील मालमत्ता व्यवहार अधिक पारदर्शक करण्यासाठी दुबई आणि सिंगापूरच्या धर्तीवर ऐतिहासिक ‘लॅण्ड टायटलिंग ॲक्ट’ लागू करण्यात येणार असून प्रत्येक मालमत्ताधारकाला सरकारमान्य प्रॉपर्टी कार्ड दिले जाणार आहे. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल. तसेच, यामुळे जमिनीची १५ दिवसांत मोजणी, नोंदणी व म्युटेशन ही प्रक्रिया सुलभ होईल,’’ असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### ठाण्यातील कंटेंट क्रिएटर्स आणि यूट्यूबर्सशी संवाद

गुरुवारी ठाणे दौऱ्यावर आलेल्या महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाणे जिल्ह्यातील कंटेंट क्रिएटर्स आणि यूट्यूबर्सशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महसूल विभागाला जनतेशी जास्तीत-जास्त कसे जोडता येईल याबाबत व स्थानिक युवकांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली. तसेच, याप्रसंगी त्यांनी क्रिएटर्सना केंद्र व राज्य सरकार राबवत असलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती समाजमाध्यमांतून अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

## ठाण्यासाठी महत्त्वाच्या घोषणांचा वर्षाव

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी ठाणे दौऱ्यादरम्यान पत्रकार परिषदेत ठाणे शहर आणि जिल्ह्यासंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. यामध्ये ‘व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड’, ‘मायक्रो झोनिंग’, मुद्रांक शुल्क गैरव्यवहारांवरील कारवाई आदी निर्णयांची माहिती देतानाच ठाणे जिल्ह्यातील महायुतीतील वादावरही त्यांनी भाष्य केले.

### प्रत्येक फ्लॅटला स्वतंत्र ‘व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड’

ठाणे आणि मुंबईतील उंच इमारतींमधील प्रत्येक फ्लॅटधारकाला त्यांच्या मालमत्तेचे स्वतंत्र ‘व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड’ देण्यात येणार असल्याची घोषणा बावनकुळे यांनी केली. तसेच दि. १५ ऑक्टोबर २०२३ पूर्वी बांधलेल्या आणि तुकडेबंदी कायद्यामुळे रखडलेल्या घरांना ‘स्वामित्व’ योजनेअंतर्गत कायदेशीर मान्यता देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### ‘मायक्रो झोनिंग’ची अंमलबजावणी

सध्या एखाद्या परिसरातील सर्वाधिक महागड्या इमारतीच्या आधारे संपूर्ण परिसराचा रेडीरेकनर दर निश्चित केला जात असल्याने छोट्या घरांनाही त्याचा फटका बसतो. हा अन्याय दूर करण्यासाठी मुंबई, ठाण्यासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ‘मायक्रो झोनिंग’ लागू करण्यात येणार असून, प्रत्येक इमारत आणि घराचा स्वतंत्र रेडीरेकनर दर निश्चित केला जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### महायुतीतील वादावर भूमिका

ठाण्यातील काही कार्यक्रमांमध्ये भाजप आमदारांना डावलल्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले, ‘‘उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अत्यंत प्रगल्भ नेते आहेत. स्थानिक आमदार, मंत्री आणि पालकमंत्री एकत्र बसून हे प्रश्न सोडवतील. महायुतीतील प्रश्न स्थानिक पातळीवरच मार्गी लागतील,’’ असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### गैरव्यवहारांवर कारवाईचा इशारा

ठाणे आणि नाशिकमध्ये मुद्रांक शुल्क बुडवणाऱ्यांची, तसेच गरिबांच्या वाट्याची घरे न देणाऱ्या संबंधितांची सखोल चौकशी केली जाईल. शासनाचा एकही रुपया बुडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच ‘टीडीआर’ घोटाळ्याच्या आरोपांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून गरज पडल्यास चौकशी करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**EPUJA SPIRITECH LIMITED**
(FORMERLY KNOWN AS SAGAR PRODUCTIONS LIMITED)
CIN: L93000MH1980PLC170432
**REDG. OFF. :** Marathon Icon 6th floor, Office no 606, Ganpatrao Kadam Marg, Lower Parel, Mumbai-400 013. Phone No. : 6263 879 732
E-mail :-splgrive@rediffmail.com ● Website: www.sagarproduction.com

**NOTICE OF POSTAL BALLOT**

**(Pursuant to Section 110 of Companies Act, 2013 and read with the Companies (Management and Administration) Rules, 2014 each as amended)**

NOTICE is hereby given pursuant to the provisions of Section 110 read with Section 108 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013 (“Companies Act”), read with Rule 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (“Rules”), (including any statutory modification or re-enactment thereof, for the time being in force) that the Resolution as set out in the postal ballot notice dated 29th July, 2026 is proposed to be passed by the member of the company, by way of electronic voting.

In terms of the Companies Act, 2013 read with Rules made thereunder and in accordance with the guidelines prescribed by the Ministry of Corporate Affairs for holding general meetings/conducting postal ballot process through e-voting vide general circulars issued in this connection, the Postal ballot notice along with the instructions regarding e-voting has been sent only by email on 29th July, 2026, to all the shareholders of the Company whose names appear on the Register of Members/List of Beneficial Owners as on Friday, 24th July, 2026 (“Cut-Off Date"), received from the Depositories and whose e-mail address is registered with the Company/ the Depository Participant(s). Members are required to communicate their assent or dissent through remote e-voting system only.

The Postal Ballot Notice is also available on the website of the Company at https://epuja.co.in, on the website of Stock Exchanges i.e. BSE Limited and on the website of CDSL at www.cdslindia.com .

The Company has engaged the services of CDSL as the agency to provide e-Voting Facility. The instructions for e-voting are provided as part of this Postal Ballot Notice which the members are requested to read carefully before casting their vote. CS Megha Kamal Samdani, Practicing Company Secretary of M K Samdani & Co., Company Secretaries, Ahmedabad, have been appointed as the Scrutinizer o scrutinize the Postal Ballot process, in a fair and transparent manner. The e-voting period commences at 9:00 AM (IST) on Thursday 30th July, 2026 and ends at 5:00 PM (IST) on Friday, 28th August, 2026. The e-voting module shall be disabled by the CDSL for voting thereafter. During this period, shareholders of the Company, holding shares, either in physical form or in dematerialized form, as on the cut- off date of Friday, 24th July, 2026, may cast their vote electronically. Once the vote on a resolution is cast, the shareholder shall not be allowed to change it subsequently. The Scrutinizer will submit his report, after completion of scrutiny, to the Chairman or any person authorized by him, on or before 29th August, 2026. The declared results along with the report of the Scrutinzer shall be forwarded to the BSE and shall be uploaded on the website of the Company at https://epuja.co.in and on the website of CDSL at www.cdslindia.com.

In case of any queries related to e-voting, you may refer the Frequently Asked Questions (‘FAQS") and e-voting user manual available at the download section of https:/www.evoting.nsdl.com or Members facing any technical issue in login can contact CDSL helpdesk by sending a request at **helpdesk.evoting@cdslindia.com** or contact at **toll free no. 1800 22 55 33.**

Date : 30.07.2026
Place: Mumbai

**For, Epuja Spiritech Limited**
(Formerly known as Sagar Productions Limited)
Sd/-
**Deeksha Pathak**
**Company Secretary and Compliance Officer**

**Vinyl Chemicals (India) Limited**
**CIN:** L24100MH1986PLC039837
**Regd. Office:** 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
**Tel:** 22822708/69829000 **E-mail:** cs.vinylchemicals@pidilite.com **Website:** www.vinylchemicals.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30.06.2026**

(₹ In lakhs)

| Particulars | For the Quarter ended | | For the Year ended | |
|---|---|---|---|---|
| | 30.06.2026 | 30.06.2025 | 31.03.2026 | 31.03.2025 |
| | Unaudited | Unaudited | Audited | Audited |
| Total income | 10,592 | 15,532 | 66,363 | 63,026 |
| Profit/(loss) for the period before tax | 889 | 602 | 2,218 | 3,040 |
| Profit/(loss) for the period after tax | 662 | 445 | 1,650 | 2,233 |
| Total Comprehensive Income for the period [comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 660 | 443 | 1,643 | 2,227 |
| Equity Share Capital (Face value of share: ₹ 1) | 183 | 183 | 183 | 183 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | 12,842 | 12,483 |
| Earnings per share of ₹ 1 each in ₹: | | | | |
| Basic | @3.61 | @2.42 | 8.99 | 12.17 |
| Diluted | @3.61 | @2.42 | 8.99 | 12.17 |

@ For the period only and not annualised

**Note:**
The above is an extract of the detailed Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Unaudited Financial Results are available on the Websites of BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com and on the Company’s Website www.vinylchemicals.com.

Mumbai
Dated: 30th July 2026

**M.B. PAREKH**
**Chairman & Managing Director**
(DIN: 00180955)

## ठाण्यात बावनकुळे यांचा सत्कार

### सोहळ्यात महत्त्वाच्या निर्णयांची माहिती

**ठाणे, दि. ३० : विशेष प्रतिनिधी**

‘ठाणे डिस्ट्रिक्ट हाऊसिंग फेडरेशन’ आणि आ. संजय केळकर यांच्या ‘ठाणे शहर सोसायटी मंच’च्या संयुक्त विद्यमाने गडकरी रंगायतन येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बावनकुळे यांनी विविध महत्त्वाच्या निर्णयांची माहिती दिली. तर आ. संजय केळकर यांनी महसूल विभागाच्या लोकाभिमुख निर्णयांमुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे सांगितले. ठाण्यातील क्लस्टर पुनर्विकासाच्या ४४ आराखड्यांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, आ. किसन कथोरे, आ. माधवी नाईक, आ. कुमार आयलानी, आ. विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सिताराम राणे, भाजप जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांसह मान्यवर उपस्थित होते.

### कार्यक्रमात ‘केळकरांना मंत्रिपद’च्या घोषणा; बावनकुळेंकडून स्तुतीसुमने

‘‘एक लोकप्रतिनिधी कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आ. संजय केळकर आहेत. त्यांचा मलाही अभिमान आहे,’’ अशा शब्दांत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार केळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमात उपस्थितांनी ‘‘आता केळकरांना मंत्रिपद’’ अशा घोषणा दिल्या. त्यावर बावनकुळे म्हणाले, ‘‘या सत्काराच्या निमित्ताने तुमचा निरोप मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवतो. केळकर त्या पदाचे योग्य दावेदार आहेत. मात्र, यासाठी संजयजींनी माझा सत्कार केलेला नाही,’’ अशी मिश्कील कोपरखळीही त्यांनी शेवटी लगावली.

## फेरीवाला निर्मूलनात ढिलाई भोवणार

### कारवाईत कसूर केल्यास थेट निलंबन; आयुक्तांचा इशारा, विशेष पथके मैदानात

**डोंबिवली :** डोंबिवलीतील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील कारवाईत कोणतीही ढिलाई खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा कल्याण-डोंबिवली महापालिकेने दिला आहे.

फेरीवाला निर्मूलन मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट निलंबनाची कारवाई केली जाईल, असे आदेश महापौर ॲड. हर्षाली चौधरी आणि आयुक्त अभिनव गोयल यांनी दिले आहेत. या कठोर भूमिकेमुळे पालिका कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, साहाय्यक आयुक्तांनी विशेष पथके नियुक्त करून धडक मोहीम सुरू केली आहे. प्रत्येक प्रभागात फेरीवाला निर्मूलन मोहिमेसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, पदपथ, रस्ते आणि सार्वजनिक जागांवर फेरीवाले पुन्हा बसत असल्याच्या सातत्याने तक्रारी येत असल्याने महापालिकेने जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

### कारवाईत हलगर्जी महागात; दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन

‘ना फेरीवाला क्षेत्रात’ मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात कसूर केल्याप्रकरणी ‘ग’ प्रभागातील कमलाकर सोनवणे आणि रवी बर्वे या कर्मचाऱ्यांना आयुक्त अभिनव गोयल यांनी निलंबित केले आहे. यापुढेही कामात हलगर्जीपणा किंवा कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अशीच कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ‘ग’ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त जयराम शिंदे यांनी दिला.

## गुरुपौर्णिमेनिमित्त मो. ह. विद्यालयात पं. मुकुंद मराठे यांचा सत्कार

**ठाणे :** ‘जएई’चे मो. ह. विद्यालय व रमेश परमार कनिष्ठ महाविद्यालय, तसेच अभिरुची मंडळ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा ज्येष्ठ हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पं. मुकुंद मराठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



संगीत रंगभूमी आणि शास्त्रीय गायन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पं. मुकुंद मराठे यांना दि. १३ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे केंद्र सरकारचा ‘संगीत नाटक अकादमी’ पुरस्कार प्रदान होणार आहे. त्यानिमित्त विद्यालयातर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पं. मुकुंद मराठे यांनी गुरूंचे जीवनातील स्थान, संस्कारांचे महत्त्व आणि ज्ञानासोबत मूल्यांची जोपासना करण्याची गरज अधोरेखित केली. ‘विज्ञानाने जीवनाला उंची दिली, तर संगीताने खोली दिली,’ असे सांगत त्यांनी ‘भूप’ रागातील बंदिश सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. अध्यक्षीय भाषणात शैलेंद्र साळवी यांनी गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून समाजोपयोगी व संवेदनशील नागरिक बनण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापिका सविता पेंडसे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्य परंपरेवर मनोगते सादर केली.

यावेळी प्रवीणकुमार जाधव, अनिता जाधव, दिलीप जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास विद्यार्थी आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी फिरत्या वैद्यकीय सुविधा केंद्राचा शुभारंभ

### ‘स्वयम्’ संस्थेतर्फे गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे, दि. ३० : विशेष प्रतिनिधी**

गेली २० वर्षे ठाणे व परिसरातील दिव्यांग व्यक्ती, बहुविकलांग मुले आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या ‘स्वयम् - बहुविकलांग मुलांचे पुनर्वसन केंद्र’ या संस्थेने समाजसेवेतील आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. संस्थेच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांगांसाठी ‘दिव्यांगांसाठी फिरते वैद्यकीय सुविधा केंद्र’ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला असून, गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते याचे लोकार्पण करण्यात आले.



‘स्वयम्’ संस्थेमार्फत दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय उपचार, फिजिओथेरपी, विशेष शिक्षण, समुपदेशन अशा विविध आवश्यक सेवा सातत्याने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. गेल्या दोन दशकांत हजारो दिव्यांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांचा शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक ताण कमी करण्यासाठी संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक दिव्यांग व्यक्तींना उपचार, प्रमाणपत्रे, शासकीय सुविधा आणि पुनर्वसन सेवांसाठी वारंवार शहरात यावे लागते. हा प्रवास शारीरिकदृष्ट्या कष्टदायक आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याने अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागतो. याच समस्येवर उपाय म्हणून ‘दिव्यांगांसाठी फिरते वैद्यकीय सुविधा केंद्र’ ही संकल्पना विकसित करण्यात आली आहे.

उद्घाटनप्रसंगी ‘स्वयम् बहुविकलांग संस्थे’च्या संचालिका नीता देवळालकर, राजीव देवळालकर, श्रेया देवळालकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

### फिरत्या सुविधा केंद्रातून गावागावांत सेवा

फिरत्या केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग प्रमाणपत्र व ‘यूडीआयडी’ कार्डासाठी मार्गदर्शन, वैद्यकीय तपासणी, साहाय्यक उपकरणांचे मूल्यमापन व वितरण, फिजिओथेरपी, पालकांसाठी प्रशिक्षण, गृहस्थित उपचारांचे मार्गदर्शन, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, कौशल्य विकास, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय, अंगणवाडी सेविका आणि आशा कार्यकर्त्यांनाही दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान व प्रारंभिक हस्तक्षेपाबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

### ग्रामीण, दुर्गम भागातील दिव्यांगांना दिलासा

या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम भागातील दिव्यांग व्यक्तींना थेट त्यांच्या दारापर्यंत आवश्यक वैद्यकीय आणि पुनर्वसन सेवा उपलब्ध होतील. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन अधिक सुलभ, सर्वसमावेशक व प्रभावी होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास ‘स्वयम् संस्थे’ने व्यक्त केला.

## ‘स्वामींचे घर’मध्ये वेदमूर्ती वैदिक गुरूंचा सन्मान



**डोंबिवली :** गुरुपौर्णिमेनिमित्त स्वामींच्या घरात नागपूर, जालना, उज्जैन, पुणे, सातारा आणि कोकण येथील सात वेदमूर्ती वैदिक गुरूंचा मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ‘स्वामींचे घर’च्या विश्वस्त माधवी सरखोत यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत स्वामींच्या घरात वेदपाठशाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली. त्यानंतर वेदमूर्ती दत्तात्रय मुरवणे, कृष्णा आर्वीकर, गोपाळ शास्त्री जोशी, दत्तात्रय घनपाठी, तुकाराम मुळे, दुर्गादास अंबुलगेकर आणि देशिक कस्तुरे गुरुजी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वेदमूर्तींनी भारतीय सनातन संस्कृतीत ‘वेद’ आणि पुराणांचे असलेले महत्त्व अधोरेखित करत संस्थेच्या कार्याला शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

### महोत्सवाची सांगता

आषाढी एकादशी ते गुरुपौर्णिमा या कालावधीत स्वामींच्या घरात वेदपारायण, अभंगवारी, भजनसंध्या, व्याख्याने आणि अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुपौर्णिमेनिमित्त वैदिक गुरूंच्या आशीर्वचनपर सूक्तपठणाने महोत्सवाची सांगता झाली.

**निवेदन**

**मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.**

## PUBLIC NOTICE

### IN THE COURT OF CIVIL JUDGE S.D. AT BELAPUR SPL.C.S.NO. 560 OF 2023

Exh. 36

**BANK OF BARODA,** a body Corporate, Constituted under the Banking Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act V-1970, having their Head Office at Mandvi, Baroda, Gujrat State and one of their Branch Office at Big Splash, Sector 17, Vashi, Navi Mumbai - 400705.

**........ PLAINTIFF**

**Versus**

**1) MR. PRABHAKAR DHAWLE & ANR**
Room No. 336, Panchshil Nagar, Amar Mahal Chambur Navi Mumbai - 400089 **And** Flat No. 202, Rameshwar Apt. Plot No. B-44 Sector 19, Koparkhairne, Navi Mumbai - 400709

**2) MR. SAWALERAM RANGANATH NIMSE**
44-I, Room No. 206, Sector - 7 Koparkhairne, Navi Mumbai - 400709

**....DEFENDANT**

WHEREAS the abovenamed Plaintiff has filed the abovenamed Special Civil Suit in the Hon'ble Court of 3rd Jt. Civil Judge Senior Division and Chief Judicial Magistrate, Belapur presided by The matter is kept for appearance on You, Defendant are hereby given this notice to appear before the Hon'ble Court in person or by an Advocate duly instructed to show cause on or before 11:00 am or within 30 days from the date of publication of this notice; falling which, the said Application will be heard in your absence and determined Ex-parte.

**Given under my hand and the seal of this Court, this 18 Day of July 2026.**

Seal

**By Order**
**Civil Court S.D.,**
**Belapur**

## JHARIA REHABILITATION AND DEVELOPMENT AUTHORITY, DHANBAD

**e-Procurement Notice**
**Tender Reference No:** JRDA/CIVIL/26-27/18/196
**Date:** 29.07.2026

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of Work | Upgradation of Phase-I, II and III of Visthapit Awas at Belgaria, Dhanbad (2nd Call) |
| 2. | Estimated Cost | Rs. 82,46,58,596.00 |
| 3. | EMD | Rs. 82,46,600.00 |
| 4. | Tender Document Cost | Rs. 10,000.00 |
| 5. | Time of Completion | 18 months |
| 6. | Date/Time from which bid is available for online bidding | 03.08.2026 at 12:00 PM |
| 7. | Last Date/Time for on-line submission of bids | 24.08.2026 at 05:00 PM |
| 8. | Date and Time of Bid Opening | 25.08.2026 at 05:10 PM |
| 9. | Name and Address of Officer inviting tender | Head of Department (Civil), JRDA, Dhanbad Hatia More, Golf Ground Road, Hirapur, Dhanbad - 826001 Jharkhand, India Email: infojrda.dhn@gmail.com |

**Note : 1.** Only e-tenders will be accepted.
2. Further details can be seen on website – https://jharkhandtenders.gov.in

**Head of Department (Civil), JRDA, Dhanbad**

**PR.NO.386243 District(26-27):D**

## FORM NO. INC-26

**PUBLIC NOTICE**

**[Pursuant to Rule 30 of Companies (Incorporation) Rules 2014]**

Advertisement to be published in Newspaper for the change in Registered Office of the Company from the jurisdiction of one Registrar of Companies to another within the Same State

**BEFORE THE REGIONAL DIRECTOR (WESTERN REGION) MUMBAI**
**IN THE MATTER OF SECTION 12(5) OF THE COMPANIES ACT, 2013**
**AND**
**IN THE MATTER OF SAIP REAL ESTATE PRIVATE LIMITED ("COMPANY")**
**CIN: U70102MH2015PTC268390**
**REGISTERED OFFICE: OFFICE NO. 401, B WING,THE CAPITAL G-BLOCK BANDRA KURLA, BH ICICI BANK, BANDRA EAST, MUMBAI CITY, MUMBAI, MAHARASHTRA, INDIA, 400051**

**.....PETITIONER**

Notice is hereby given to the General Public that the Company proposes to make an application to the Central Government under the provisions of Section 12(5) of the Companies Act, 2013 read with the applicable provisions of the Companies (Incorporation) Rules, 2014, seeking confirmation of the shifting of its Registered Office from the jurisdiction of one Registrar of Companies to another Registrar of Companies within the State of Maharashtra, pursuant to the Special Resolution passed by the Members of the Company at the Extra-Ordinary General Meeting held on Wednesday, 08th July, 2026.

The Registered Office of the Company is proposed to be shifted from:
**Office No. 401, B Wing,The Capital G-Block Bandra Kurla, Bh ICICI Bank, Bandra East, Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400051**
**to**
**Dr. D. Y. Patil International Academy, Plot No. 50, Sector-15, CBD Belapur, Navi Mumbai – 400614.**

Any person whose interest is likely to be affected by the proposed shifting of the Registered Office of the Company may deliver either on the MCA-21 Portal (www.mca.gov.in) by filing an Investor Complaint Form or cause to be delivered or send by Registered Post his/her objections supported by an affidavit stating the nature of his/her interest and the grounds of opposition to the Regional Director, Western Region, Ministry of Corporate Affairs, within fourteen (14) days from the date of publication of this notice, with a copy to the Applicant Company at its Registered Office mentioned above.

For and on behalf of applicant
**SAIP REAL ESTATE PRIVATE LIMITED**
Sd/-
**AVADHUT BHAIRANNA KANADE**
Director
DIN: 07766985
Address: Lane No.1A, Pushpanjali Bangla No-27, North Main Road, Near Kasturba School, Koregaon park, Haveli, Pune, Haveli, Maharashtra- 411001.

## FORM NO. INC-26

**PUBLIC NOTICE**

**[Pursuant to Rule 30 of Companies (Incorporation) Rules 2014]**

Advertisement to be published in Newspaper for the change in Registered Office of the Company from the jurisdiction of one Registrar of Companies to another within the Same State

**BEFORE THE REGIONAL DIRECTOR (WESTERN REGION) MUMBAI**
**IN THE MATTER OF SECTION 12(5) OF THE COMPANIES ACT, 2013**
**AND**
**IN THE MATTER OF AJEENKYA D. Y. PATIL HEALTHCARE PRIVATE LIMITED ("COMPANY")**
**CIN: U85100MH2021PTC369942**
**REGISTERED OFFICE: 401BWING, THE CAPITAL G-BLOCK BANDRA KURL BEHIND ICICI BANK PLOT -C70, BANDRA(EAST), MUMBAI CITY, MUMBAI, MAHARASHTRA, INDIA, 400051**

**.....PETITIONER**

Notice is hereby given to the General Public that the Company proposes to make an application to the Central Government under the provisions of Section 12(5) of the Companies Act, 2013 read with the applicable provisions of the Companies (Incorporation) Rules, 2014, seeking confirmation of the shifting of its Registered Office from the jurisdiction of one Registrar of Companies to another Registrar of Companies within the State of Maharashtra, pursuant to the Special Resolution passed by the Members of the Company at the Extra-Ordinary General Meeting held on Wednesday, 08th July, 2026.

The Registered Office of the Company is proposed to be shifted from:
**401B Wing, The Capital G-Block Bandra Kurl Behind Icici Bank Plot - C70, Bandra (East), Mumbai City, Mumbai, Maharashtra, India, 400051**
**to**
